<u>न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, नांदुरा यांच्या न्यायालयात</u>

**नि.फौ.ख.क्र. ४६७/२०२१** **निशाणी क्र. ०४**

## <u>दोषारोप</u>

मी, म. बा. आसिजा, न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, नांदुरा याद्वारे दोषारोप ठेवतो की, तुम्ही –

**संदिप पुरुषोत्तम माउलकार,**
वय – ३४ वर्ष, धंदा – चालक,

रा. सुटाळा बु., ता. खामगाव, जि. बुलडाणा.

दिनांक २४/०७/२०२१ रोजी दुपारी १२.०० वाजेच्या सुमारास, काळी पिवळी स्टॉप, रेल्वे गेट, नांदुरा, ता. नांदुरा, जि. बुलडाणा येथे तुम्ही आरोपीने फिर्यादीला दगड या घातक हत्याराने मारहाण करुन इच्छापूर्वक दुखापत पोहोचविली व त्या अन्वये भारतीय दंड विधानाचे कलम ३२४ अन्वये शिक्षापात्र अपराध केला.

२. वरील तारीख, वेळी व ठिकाणी तुम्ही आरोपीने फिर्यादीला लोटपाट व धक्काबुक्की करुन इच्छापूर्वक दुखापत पोहोचविली व त्या अन्वये भारतीय दंड विधान कलम ३२३ अन्वये शिक्षापात्र अपराध केला.

३. वरील तारीख, वेळी व ठिकाणी तुम्ही आरोपीने फिर्यादीला शांतता भंग घडवून आणण्याच्या उद्देशाने त्यांचा अपमान करुन त्यांना प्रक्षोभीत केले व त्या अन्वये भारतीय दंड विधान कलम ५०४ अन्वये शिक्षापात्र अपराध केला.

४. वरील तारीख, वेळी व ठिकाणी तुम्ही आरोपीने फिर्यादीला फौजदारीपात्र धाकदपटशा करुन जीवे मारण्याची धमकी दिली व त्या अन्वये भारतीय दंड विधानाचे कलम ५०६ अन्वये शिक्षापात्र अपराध केला.

वरील अपराध माझ्या कार्यक्षेत्रात घडल्याने मी त्याची दखल घेतो

आणि याद्वारे मी असा निर्देश देतो की, उक्त आरोपांबाबत या न्यायालयामार्फत तुमची न्यायचौकशी होईल.

सही/-
**(म.बा. आसिजा)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
नांदुरा.

नांदुरा.
दिनांक – १७/११/२०२१.

वरील तपशिलातील मजकूर आरोपीस वाचून व समजावून सांगितला, त्यास त्यांनी नकार दिला.

सही/-
**(म.बा. आसिजा)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, नांदुरा.

नांदुरा.
दिनांक – १७/११/२०२१.

\- - - - -